# ८. शब्दांचे घर

- **ऐका. वाचा. म्हणा.**

सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर
त्यांतून काही हळवे हळवे राहत होते स्वर

घरात होता, काना–मात्रा–वेलांटीचा मेळ
एकोप्याने खेळायाचे सगळे अक्षर–खेळ
विरामचिन्हांचीही होती सोबत वरचेवर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

एखाद्याची धुसफुससुद्‌धा हवीहवीशी छान
प्रत्येकाला अर्थ वेगळा सुखदुःखाचे भान
मधले अंतर कुरवाळाया रेघांचे छप्पर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

कानोकानी कुजबुजताना अंकुर मनकोवळा
वाट मोकळी होऊन लागे कवितेचाही लळा
अवतीभवती झिरपत राही गाणे काळीजभर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर




**कल्याण इनामदार** (१९३९–२००८) : 'आभाळाचे पंख', 'अजब गाणी', 'अक्षर गाणी', 'धमाल गाणी' इत्यादी बालसाहित्य प्रसिद्‌ध. भाषेद्‌वारे आपण आपले विचार, सुखदुःख व्यक्त करतो. प्रस्तुत कवितेतून कवीने आपल्याभोवतीचे शब्दांचे वावरणे कसे सुंदर आहे, हे सांगितले आहे.

**शब्दार्थ : हळवे** – कोमल. **मेळ** – एकत्र असणे. **धुसफुस** – जळफळणे. **भान** – लक्ष, ध्यान. **झिरपणे** – पाझरणे.

## स्वाध्याय



**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) शब्दांच्या घरात राहणारे –

(आ) घरात एकोप्याने खेळणारे –

(इ) अवतीभवती झिरपणारे –

**प्र. २. कवितेच्या खालील ओळी पूर्ण करा.**

(१) घरात होता,..............
.............. अक्षर–खेळ.

(२) एखाद्याची..............
.............. भान.

(३) कानोकानी..............
.............. कवितेचाही लळा.



### चर्चा करा. सांगा.

- **शब्दांमुळे, भाषेमुळे दैनंदिन व्यवहारात कोणते फायदे होतात, या विषयावर मित्रांशी चर्चा करा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांपासून अर्थपूर्ण शब्द बनवा.**

उदा., लांटीवे–वेलांटी

(१) सफुधुस (२) रकुअं (३) कानीनोका

**(आ) खालील शब्दांना कवितेत आलेली विशेषणे लिहा.**

(१) ..............घर.

(२) ..............स्वर.

(३) ..............अंकुर.

(४) ..............वाट.

**(इ) खालील शब्दसाखळी पूर्ण करा.**

उदा., सुनीता → तारा → राघवेंद्र → द्रव → वजन → नमन →.........

**प्रकल्प :**

'शब्द' या विषयावर आधारित सुविचार मिळवा. त्यांचा संग्रह करा. त्याची सुंदर चिकटवही बनवा.

## खेळ खेळूया.

- खालील चौकटी वाचा. त्याप्रमाणे उरलेल्या चौकटी पूर्ण करा.

(अ) कप → काटा → किसणी → कीव → कुसुम → कूट → केर → कैरी → कोपरा → कौल → कंठ

(क)

(आ) सण → ______ → ______ → सीता → ______ → सूप → ______ → ______ → सोने → ______ → संगत

(स)

## शब्दकोडे सोडवूया.

- खालील चौकोनातील अक्षरांमध्ये शब्दयोगी अव्यये लपलेली आहेत. उभ्या, आडव्या, तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन शब्दयोगी अव्यये बनवा व दिलेल्या जागेत लिहा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ती | नं | स | क | ट |
| व | ल | त | सा | ठी |
| र | स | मो | र | पु |
| न | ह | प्र | खा | ढे |
| जी | त | मा | गे | ली |
| क | प | णे | क | ड |

______ ______
______ ______
______ ______
______ ______
______ ______
______ ______



## वाचा.

- विरामचिन्हांचा वापर करून परिच्छेद सुवाच्य अक्षरांत पुन्हा लिहा.

D2BRKJ

मुलांनो शाळेत तुम्हांला अनेक मित्र असतात तुमची काळजी घेणारे तुमचे आरोग्य जपणारे असे अनेक मित्र तुमच्या सभोवती आहेत कोण बरे आहेत हे मित्र असा प्रश्न तुम्हांला निश्चितच पडेल आपल्याला फळे फुले सावली देणारे वृक्ष आपल्याला पिण्यासाठी पाणी देणाऱ्या नद्या श्वसनासाठी ऑक्सिजन देणारी हवा आपण ज्यावर निवांतपणे राहतो अशी जमीन अर्थातच आपल्या सभोवतालचा निसर्ग हाच आपला खरा मित्र आहे

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील सर्व भाषिक खेळ खेळण्याची संधी द्यावी. असे विविध भाषिक खेळ स्वत: तयार करून विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक सराव करून घ्यावा.